MHYA160004112015

खटला दाखल तारीख : २९.०९.२०१५
खटला नोंदणी तारीख : २९.०९.२०१५
निकालाची तारीख : २४.०३.२०२६
कालावधी : १० वर्ष ०३ महिने २५ दिवस

# न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी यांचे न्यायालय,बाभुळगाव

(पीठासीन अधिकारी – श्री एच.एस.सातपुते यांचे समोर)

**नियमीत फौजदारी खटला क्र. १०८/२०१५.** **निशाणी क्र. ४५/ब**

- महाराष्ट्र सरकार मार्फत
  पोलीस ठाणे बाभुळगाव,
  ता. बाभुळगाव जि. यवतमाळ. ....**अभियोग पक्ष.**

:: **विरुध्द** ::

(१) सुनिल शंकरराव डेबुर
वय : २७ वर्ष, धंदा : मजूरी,
(२) नामदेव शंकर भारती
वय :२७ वर्ष, धंदा : मजूरी,
(३) प्रविण रामदास गाडेकर (मयत)
वय : २१ वर्ष, धंदा : मजूरी,
सर्व, राहणार : खर्डा, ता. बाभुळगाव,
जिल्हा यवतमाळ. ....**आरोपी.**

**गुन्हा – भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४६१ व ३८० सह कलम ३४ अन्वये.**

.......................................................................................................

- सहाय्यक सरकारी अभियोक्ता – श्री. पी. डी. राठोड
- आरोपीचे विधीज्ञ – श्री. जी. व्ही. कडूकार

.......................................................................................................

## न्यायनिर्णय

(आज दिनांक २४ मार्च, २०२६ रोजी पारीत)

आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४६१ व ३८० सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवण्यात आला आहे.

अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात खालील प्रमाणे :-

२) दिनांक २३.०६.२०१५ रोजी फिर्यादी अंकुश रंगराव शेंडे याने नेहमीप्रमाणे सकाळी ६.०० वाजता किरणा दुकान व पानठेला उघडला आणि दिवसभर गिऱ्हाईक करुन रात्री ९.३० वाजता बंद करुन घरी गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी ७.०० वाजता फिर्यादी दुकान उघडण्यास आला. त्यावेळी त्याने त्याच्या दुकानाला लावलेल्या शटरचे ताले त्याला लावलेले दिसून आले नाहीत. त्याने आजुबाजुला पाहीले असता त्याला एक ताला दुकानाच्या बाजुला पडून दिसले. त्यामुळे त्याला त्याच्या दुकानात चोरी झाल्याचे समजले. त्याने शटर उघडून दुकानाची पाहणी केली. त्याला दुकानातील किराणा सामान अंदाजे ७०००/- रुपये, १० किलो सुपारी ज्याची किंमत अंदाजे ३०००/- रुपये व मोबाईल रिचार्ज वोडाफोन व आयडीया कंपनीचे कार्ड ज्याची किंमत ४५००/- रुपये असा एकुन १४५००/- रुपयाचा मुद्देमाल रुपयाचा माल कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरुन नेल्याचे दिसून आले. त्यामुळे फिर्यादीने अज्ञात इसमाविरुध्द पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिला.

३) फिर्यादीने दिलेल्या लेखी रिपोर्टवरुन पोलीस ठाणे बाभुळगाव येथे आरोपी अज्ञातव्यक्तीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४६१ व ३८० प्रमाणे अपराध क्र. १४१/२०१५ नोंदविण्यात आला आहे. तपासाचे काम सहाय्यक पोलीस नाईक अनिल सांगळे यांच्याकडे दिल्यानंतर त्यांनी साक्षीदारांचे जाबजवाब नोंदविले आहेत. इतर कागदपत्रे मिळाल्यानंतर आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द तपासाअंती पुरेसा पुरावा मिळून आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

४) माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द निशाणी क्र. २८ वर भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४६१ व ३८० सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेऊन आरोपींना

मराठी भाषेत वाचून व समजावून सांगितला असता आरोपींनी दोषारोपातील मजकूर कबुल नसल्याचे सांगून संपरिक्षेची मागणी केली आहे. सदरचे प्रकरण चालु असतांना आरोपी क्र. ३ प्रविण रामदास गाडेकर हा मयत झाला आहे.

५) आरोपी विरुध्द दोषारोप सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने चार साक्षीदार तपासले आहेत. निशाणी क्र. ३२ वर साक्षीदार क्र. १ अंकुश रमराव शेंडे (फिर्यादी), निशाणी क्र. ३७ वर साक्षीदार क्र. २ पुरुषोत्तम भोयर (घटनास्थळ पंच), निशाणी क्र. ३९ वर साक्षीदार क्र. ३ मोहम्मद तंजीम हुसेन (निवेदन पंच/जप्ती पंच) निशाणी क्र. ४२ अनिरुध्द आकाराम गवारगुरु (दाखल अधिकारी) अन्वये तपासले आहेत. दिनांक २४/०३/२०२६ रोजी अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला आहे.

६) आरोपींचे भारतीय नागरीक सुरक्षा संहितेच्या कलम ३५१ प्रमाणे स्पष्टीकरण अनुक्रमे निशाणी क्र. ४३ व ४४ प्रमाणे नोंदविण्यात आले आहे. आरोपींनी त्यांच्याविरुद्ध खोटी केस केली आहे, असा बचाव घेतलेला आहे.

७) अभिलेखावरील पुरावा व दोन्ही पक्षांचे युक्तीवाद यावरुन खालील मुद्दे माझे अवलोकनार्थ उपस्थित झाले आहेत. त्या प्रत्येक मुद्दयांना मी कारणांसह खालीलप्रमाणे उत्तर दिलेले आहे.

| **अ.क्र.** | **वाद मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १) | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, दिनांक २३/०६/२०१५ ते २४/०६/२०१५ रोजी मध्यरात्री आरोपींनी संगणमत करुन मौजा बारड ता. बाभुळगाव जि. यवतमाळ येथील फिर्यादी नामे अंकुश रंगराव शेंडे याच्या किराणा दुकान व पानठेल्यात चोरी करण्याच्या उद्देशाने घुसले त्यामुळे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम ४६१ सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | ..... नाही. |
| २) | अभियोग पक्ष हे सिध्द करतो काय की, वर नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी संगणमत करुन मौजा बाभुळगाव ता. बाभुळगाव जि. यवतमाळ येथील किराणा दुकान व पानठेल्यात १४५००/- रुपयाची चोरी केली. त्यामुळे आरोपींनी भारतीय दंड विधान कलम | ..... नाही. |

| **अ.क्र.** | **वाद मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| | ३८० सह कलम ३४ अन्वये गुन्हा केला आहे ? | |
| ३) | काय आदेश ? | ...अंतिम आदेशाप्रमाणे. |

**अभियोग पक्ष निशाणी क्र. निशाणी क्र. ३३ वरील जबानी रिपोर्ट, निशाणी क्र.३४ वरील प्रथम खबर अहवाल, निशाणी क्र. ३८ वरील घटनास्थळ पंचनाम्यावरी सही, निशाणी क्र. ४० वरील निवेदन पंचनाम्यावरील सही, निशाणी क्र.४१ वरील जप्ती पंचनाम्या वरील सही इ. कागदोपत्री पुराव्यावर विसंबुन आहे.**

## :: कारणमिमांसा ::

**मुद्दा क्र.१ करीता**

८) आरोपीन क्र. १ ते ३ यांनी दिनांक २३/०६/२०१५ ते २४/०६/२०१५ रोजी फिर्यादीच्या किराणा दुकान व पानठेल्यातून १४५००/– रुपयाची चोरी केली हे सिध्द करण्याकरीता १ ते ४ साक्षीदारांना तपासले आहेत.

९) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. १ याने न्यायालयाच्या पुढे शपथेवर असे सांगीतले आहे की, तो आरोपीला ओळखत नाही. तो मयत आरोपी क्र. ३ प्रविण गाडेकर याला ओळखतो. घटना दिनांक २३.०६.२०१५ रोजी बारड येथे त्याच्या किराणा दुकानात घटना घडली होती. तो सकाळी दुसऱ्या दिवशी उघडण्याकरीता गेला होता. त्यावेळी त्याच्या किराणा दुकानाचे व पानठेल्याची कुलुप बाजुला पडले होते. त्याने दुकान उघडून पाहीले त्यावेळी १० किलो सुपारी, ईतर किराणा दुकानाचा माल, मोबाईलचे रिचार्ज कुपन ईत्यादी १४५००/–माल चोरीला गेला होता. त्यामुळे त्याने निशाणी क्र. ३३ प्रमाणे त्यांनी रिपोर्ट दिला व निशाणी क्र. ३४ वरील प्रथम खबरी अहवाल त्यांनी दिला असल्याचे सांगीतले. त्यातील मजकुर खरा व बरोबर असल्याचे सांगुन त्यावर त्याची सही असल्याचे सांगीतले.

१०) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. २ व साक्षीदार क्र. ३ हे घटनास्थळ, निवेदन व जप्ती पंचनाम्यावरील पंच असून त्यांनी न्यायालयाच्यापुढे शपथेवर असे सांगीतले की, पोलीसांनी त्यांना पंचानामा करण्याकरीता कुठेही बोलाविले नव्हते. निशाणी क्र. ३८ वरील घटनास्थळ पंचनामा, निशाणी क्र. ४० वरील निवेदन पंचनामा आणि निशाणी क्र. ४१ वरील जप्ती पंचनाम्यावरील केवळ त्यांची असल्याचे सांगीतले. त्यातील मजकुराविषयी त्यांना काहीही माहीती नसल्याचे त्यांनी सांगीतले. सदर दोन्ही साक्षीदार हे अभियोग पक्षास सहाय्य करीत नसल्यामुळे त्यांचा उलटपास घेण्यात आला परंतू त्यातूनही काही निष्पन्न झाले नाही.

११) अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. ४ हा दाखल अधिकारी असून न्यायालयाच्या पुढे शपथेवर असे सांगत आहे की, दिनांक २३.०६.२०१५ रोजी तो पोलीस स्टेशन बाभुळगाव येथे पोलीस नाईक म्हणून कार्यरत होता. त्यादिवशी ते स्टेशन डायरीवर कार्यरत असतांना अंकुश रंगराव शेंडे हा त्यांच्याकडे फिर्याद घेवून आला होता. त्याने त्याचा निशाणी क्र. ३३ वरील जबानी रिपोर्ट नोंदविला होता. सदरचा जबानी रिपोर्ट हा पानठेल्यातील चोरीबाबत होता. त्यांनी निशाणी क्र. ३४ वरील प्रथम खबरी अहवाल हा भां. दं. वि चे कलम ४६१ व ३८० अन्वये नोंदविला होता. त्याचा अपराध क्र. १४१/२०१५ होता. त्यावर त्याच्या व फिर्यादीच्या सहया आहेत. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

१२) अभियोग पक्षाचा लेखी व तोंडी पुरावा, अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. पी. डी. राठोड व आरोपीतर्फे श्री. जी. व्ही. कडूकार यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकल्यानंतर मी अभिलेखावर आलेल्या लेखी व तोंडी पुराव्यावरील चर्चेकरीता वळत आहे. अभियोग पक्षाने उलटतपासात साक्षीदार क्र.१ याच्या निशाणी क्र. ३३ वरील जबानी रिपोर्ट मधील मजकुर व निशाणी क्र. ३४ वरील प्रथम खबर अहवालातील मजकुर न्यायालयाच्यापुढे सिध्द केला आहे. साक्षीदार क्र.१ हा त्याच्या सरतपासात तो आरोपींना ओळखतो असे सांगत आहे. त्याच्या दुकानात दिनांक २३.०६.२०१५ रोजी चोरी झाली होती. साक्षीदार क्र. १ याच्या दुकानातून १० किलो सुपारी, ईतर किराणा माल व मोबाईल रिचार्ज व्हाऊचर हे चोरीला गेले होते. साक्षीदार क्र. १ याचा आरोपींच्या विधिज्ञांनी उलटतपास घेतलेला नाही. परंतू साक्षीदार क्र. १ हा आरोपी क्र.१ ते ३ यांनीच त्याच्या दुकानात चोरी केली होती असे सांगत नाही. अभियोग पक्षाचा साक्षीदार क्र. २ हा घटनास्थळ पंचनाम्यावरील पंच आहे. सदरचा साक्षीदार हा अभियोग

पक्षाला सहकार्य करीत नाही. साक्षीदार क्र. २ याच्या तोंडी पुराव्याने घटनास्थळ पंचनाम्यातील मजकुर सिध्द झालेला नाही. साक्षीदार क्र. ३ हा निवेदन पंचनाम व जप्ती पंचनामा यावरील साक्षीदार आहे. सदरचा साक्षीदार हा देखील अभियोग पक्षाला सहाकार्य करीत नसल्याने निवेदन पंचनामा व जप्ती पंचनामा यातील मजकुर सिध्द झालेला नाही. साक्षीदार क्र. ४ याने निशाणी क्र. ३३ वरील जबानी रिपोर्ट व निशाणी क्र. ३४ वरील छापील प्रथम खबरी अहवाल हा पोलीस स्टेशनला दाखल करुन घेतला होता. साक्षीदार क्र. ४ याची साक्ष तांत्रीक बाबींवर अवलंबुन असल्याने त्याला फारसे महत्व देता येणार नाही. अभियोग पक्षाच्या एकंदरीत लेखी व तोंडी पुराव्यांचा विचार करता आरोपी क्र. १ ते ३ यांचा चोरीच्या गुन्हयातील प्रत्यक्ष सहभाग सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपी क्र. १ ते ३ विरुध्द निशाणी क्र. २८ वर ठेवलेला भारतीय दंड विधान १८६० चे कलम ४६१ व ३८० सह कलम ३४ अन्वये ठेवलेला दोषारोप सिध्द होत नाही. त्यामुळे सदरच्या गुन्हयातून आरोपीला दोषमुक्त करणे योग्य राहील. म्हणून मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ३ करीता**

१३) अभियोग पक्षाच्या लेखी व तोंडी पुराव्यावरुन मी या निष्कार्षास आलेलो आहे की, भारतीय दंड विधान १८६० चे कलम ४६१ व ३८० सह कलम ३४ लागू करण्यासाठी आवश्यक असणारे घटक संशयाचे पलीकडे जाऊन आरोपीविरुध्द सिध्द झालेले नाहीत. म्हणून मी मुद्दा क्र. ३ चे उत्तराकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## –: आदेश :–

(१) आरोपी क्र. १सुनिल शंकरराव डेबुर, आरोपी क्र. २ नामदेव शंकर भारती व आरोपी क्र. ३ प्रविण रामदास गाडेकर (मयत) यांना भारतीय दंड विधान १८६० चे कलम ३७९ सह कलम ३४ या गुन्हयातून भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७१(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

(२) आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन कदबे रद्द करण्यात येतात.

(३) पोलीस स्टेशन बाभुळगाव यांना असे आदेशीत करण्यात येते की, जप्त मुद्देमाल तिन किलो सुपारी व मोबाईल रिचार्ज ३० नग हे अपील कालावधी

संपल्यानंतर फिर्यादीला परत करण्यात यावेत. जप्त मुद्देमाल २५ सिगारेट पॉकीट हे अपील कालावधी संपल्यानंतर नष्ट करण्यात यावेत.

(३) आरोपींनी १ व २ यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ प्रमाणे, या निर्णयाविरुध्द अपील झाल्यास त्यातील त्यांची उपस्थितीची हमी म्हणून प्रत्येकी रु. १५,०००/– रकमेचे जमानत द्यावी. आरोपीने दिलेले वैयक्तीक जमानत आजपासून सहा महिन्यापर्यंत वैध राहील.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला)

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by
HARIDAS
SANDIPAN
SATPUTE
Date: 2026.03.25
17:52:02 +0530

बाभुळगाव. (एच.एस.सातपुते)

दिनांक :२४/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

बाभुळगाव.